**कृपया प्रसिध्दीसाठी** **25 डिसेंबर 2008**

## दहशतवादी हल्ल्यातील मृतांना महाराष्ट्रातले कुष्ठपीडित श्रध्दांजली वाहणार

**मुंबई, गुरुवार :** मुंबईवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याला 26 डिसेंबर रोजी महिना पूर्ण होत आहे. या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली वाहाण्यासाठी राज्यभरातील कुष्ठपीडितांचे प्रतिनिधी एकत्र येणार आहेत. यावेळी कुष्ठपीडितांबरोबर माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक हेही सामील होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेने एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

अतिरेकी हल्ल्यांमध्ये हुतात्मा झालेले लष्करी व पोलीस अधिकारी, पोलीस, तसेच बळी पडलेले निष्पाप नागरिक या सा-यांना श्रध्दांजली वाहाण्यासाठी 26 डिसेंबर रोजी सकाळी 11.00 वाजता आझाद मैदानावर राज्यातील विविध भागांतून कुष्ठपीडितांचे प्रतिनिधी येणार आहेत. माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्यासह राज्यातील कुष्ठपीडितांचे नेते सर्वश्री प्रकाश कुलकर्णी (कल्याण), बळीराम तांबडे (तुर्भे), भूपाल फिरगाणे (कल्याण), अशोक आंबेकर (पनवेल) आणि भिमराव मधाळे (बोरीवली) हेही यावेळी हजर राहाणार आहेत. कुष्ठपीडितांप्रमाणेच इतर नागरिकांनीही श्रध्दांजली वाहाण्यासाठी मोठया संख्येने सामील व्हावे, असे आवाहनही महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री. प्रकाश कुलकर्णी यांनी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**